**MHKO100012222021**

## निशाणी क्र. १ वरील आदेश

१. फिर्यादीने सदरचा अर्ज आरोपी क्र. १ ते ३ यांच्या विरुध्द भारतीय दंड संहिता कलम ४२० सह वाचन ३४ प्रमाणे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५६(३) प्रमाणे तपासाकरीता गडहिंग्लज पोलिस स्टेशन यांच्याकडे पाठविणेबाबत आदेश मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. सदर अर्जाचे व अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन केले. फिर्यादीचे वकीलांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

३. १ब मध्ये नमूद असणारी मिळकत फिर्यादीने व १क मध्ये नमुद असणारी मिळकत आरोपी क्र. १ ने खरेदी घेण्याचे ठरले असताना दिनांक ३०.१२.२०२० रोजी दुय्यम निबंधक कार्यालय येथील सर्व्हर काम करत नसल्याने नोंदणीकृत दस्त ३१.१२.२०२० रोजी नोंदवायचे असे ठरले होते. त्यानुसार फिर्यादीने रक्कम रूपये २,६४,०००/- व आरोपी क्र. १ ने रक्कम रूपये, २,१६,०००/- शामराव निळकंठ जाधव यांना दिनांक ३०.१२.२०२० रोजी दिले होते. दिनांक ३०.१२.२०२० रोजी ठरलेप्रमाणे दस्तातील सर्व मजकूर टंकलिखीत करून तो बरोबर असल्याचे मान्य करून त्यावर सहया व अंगठे केले होते. परंतु दिनांक ३०.१२.२०२० रोजी सर्व्हर काम करत नसल्याने दिनांक ३१.१२.२०२० रोजी अनुक्रमांक नोंद क्र. ३२४४ हा दस्त नोंदवण्यात आला. आरोपी क्र. १ व २ यांनी एकमेकांशी व आरोपी क्र. ३ शी संगनमत करून मिळकत १ब व १क बाबत व त्या अनुषंगाने होणा-या मोबदल्याचे रक्कमेबाबत तपशीलांची पाने काढून टाकून त्याऐवजी दिनांक ३१.१२.२०२० रोजीचे अनुक्रमांक नोंद क्र. ३२४४ मध्ये नमुद असलेले मजकुराची पाने समाविष्ठ करून सदर दस्त नोंदणीकृत करून घेतला. फिर्यादीने ३३ आर क्षेत्र खरेदी घेण्याचे ठरवून तसा मोबदला शामराव जाधव यांना दिला होता. परंतु आरोपी क्र. १ ते ३ यांनी

एकमेकांशी संगनमत करून फिर्यादी व आरोपी क्र. १ यांनी समान हिस्याने कलम १ मध्ये नमूद मिळकत खरेदी केल्याचे भासवून सदर दस्त नोंदणीकृत करून घेतला आहे.

४.        सदरील खरेदी दस्त आरोपी क्र. १ ने आपल्याकडे ठेवून घेतला व त्याआधारे खरेदी केलेल्या क्षेत्रास फिर्यादी व आरोपी क्र. १ यांच्या नावाची समाईकात नोंद करून घेतली. फिर्यादीने या दस्ताची सही शिक्क्याची नक्कल काढून घेतली असता आरोपी क्र. १ ने फिर्यादीस व शामराव जाधव यांची फसवणूक केल्याचे व त्याआधारे महसूल अभिलेखात चुकीच्या नोंदी करून घेतल्याचे समजले.

५.        अभिलेखाचे अवलोकन केले असता फिर्यादीने सदर अर्जातील कथनास दुजोरा देणेसाठी प्रतिज्ञापत्र दाखल केले नाही. सदर घटनेची तक्रार गडहिंग्लज पोलिस स्टेशन यांच्याकडे दाखल करण्यासाठी फिर्यादी गेले होते असे त्यांचे कथन नाही. तसेच फिर्यादीने पोलिस अधिक्षक, कोल्हापूर यांच्याकडेही तक्रार दाखल केली नाही. म्हणजेच फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५४(१) व १५४(३) ची पुर्तता फिर्यादीने केली नाही. त्यामुळे सदर अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५६(३) प्रमाणे तपासासाठी पोलिसांच्याकडे पाठवता येणार नाही. त्यानुसार, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१.   फिर्यादी यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५६(३) प्रमाणे तपास करणेची विनंती फेटाळणेत येत आहे.

२.   फिर्यादी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०० प्रमाणे स्वतःचे किंवा साक्षीदारांचे सत्यापनासाठी न्यायालयात हजर रहावे.

DHANASHRI MAHADEV PAWAR
Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2024.09.02 16:27:16 +0530

ठिकाण – गडहिंग्लज                                  डी. एम. पवार
दिनांक ०२/०९/२०२४                    प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, गडहिंग्लज